Printing Area
UGC Jr.No.43053
UGC Approved Refereed Journal
ISSN 2394-5303

# Printing Area®

Issue-45, Vol-03 April- 2018

## International Multilingual Research Journal

Editor
Dr.Bapu G.Gholap

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
International Multilingual Research Journal
www.vidyawarta.com

Scanned by CamScanner

14) Function of Massage in mitigating sports injuries
**Dr. Savita R. Bhoyar, Nagpur** ||66

15) Breaking Silence Voicing Concern, How far Children are safe in India ? : Sp...
**Dr. Varsha Deshmukh, Amravati** ||67

16) Operational Performance of M.S.F.C. In MARKETING OF SSI UNITS in ...
**Prof. Dr. Narendra B. Gosavi, Nandurbar** ||71

17) The Disadvantages of the Qualitative Research
**Dr. Vivek Jawale, Nashik** ||73

18) ASSESSMENT OF SOCIO-ECONOMIC ENVIRONMENT IN KHARALWADI SLUM OF PIMPRI ...
**Mr. Aniket Suresh Khatri, Pune** ||76

19) Narco analysis and Criminal privacy
**Dimpal S. Parmar, Gandhinagar** ||80

20) Information and Communication Technology in Library Prospect and...
**Prof. Vijay Bajirao Jadhav & Dr. Chandrashekhar D. Wani, Jalgaon** ||83

**21) Ethics in Education**
**Mr. Sushil Bhimrao Bansode, Kolhapur** ||85

22) रूबाई – एक काव्यप्रकार
प्रा. विद्यासागर आप्पासाहेब वाघेरे, जि. सातारा ||94

23) भारतातील स्त्री चळवळी दशा व दिशा
**प्रा.डॉ. आर.बी. लक्षटे, देगलूर** ||96

24) प्राचीन नाटयभुमीच्या आधारावर मराठी नाटयसंगीताचे भविष्य:एक अध्ययन
**Prof. Minal S. Gadve, Amravati. Maharastra** ||99

25) कविवर्य सुरेश भट यांच्या मराठी गज़लेतील आशयघनता व सांगितीक दृष्टीकोन
डॉ. कुणाल इंगळे, मुंबई ||104

26) मौलाना मेहमूद हसनचे भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्रारंभीक कार्य
**प्रा. डॉ. शेख कलीम मोहियोद्दीन, बीड** ||110

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Scanned by CamScanner

२. 'एल्गार', सुरेश भट, साहित्य प्रसार केन्द्र, सीताबर्डी, नागपूर—१२.

३. 'झंझावात', सुरेश भट, साहित्य प्रसार केंद्र, सीताबर्डी नागपुर—१२.

४. 'सप्तरंग', सुरेश भट, साहित्य प्रसार केंद्र, सीताबर्डी, नागपुर—१२.

५. 'रसवंतीचा मुजरा' सुरेश भट, साहित्य प्रसार केंद्र, सीताबर्डी नागपुर—१२.

६. सुरेश भट आणि प्रदीप निफाडकर, नंदिनी पब्लिरिंग हाऊस, बी ६, विशाल पार्क विठ्ठलवाडी, सिहगड रोड, पुणे ४११ ०५१.

७. सुरेश भट हयांची निवडक कविता, शिरीष पै, साहित्य प्रसार केंद्र, सीताबर्डी, नागपूर —४४० ०१२.

८. 'गज़ल', प्रा. डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी, मेहता पब्लिकशिंग हाऊस, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३०.

९. संगीत शास्त्र—विज्ञान —डॉ. सुचेता बिडकर, संसार प्रकाशन, ६/४००, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुंबई ४०० ०३३.

१०. गज़ल एक अध्ययन, चानन गोविंद पुरी.

११. हिन्दोस्तानी संगीत में गज़ल गायकी, डॉ. प्रेम भंडारी, राधा पब्लिकेशन, नई दिल्ली ११० ००२

❑❑❑.

**26**

# मौलाना मेहमूद हसनचे भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्रारंभीक काय

**प्रा. डॉ. शेख कलीम मोहियोद्दीन**
इतिहास विभाग प्रमुख,
मिल्ली महाविद्यालय, बीड

**प्रस्ताविक :**

**समरा-अल तरबीया या संघटनेची स्थापना :-** १८७८ मध्ये मौलाना मेहमूद हसन यांनी त्यांचे गुरू मौलाना मोहम्मद कासीम नानोतवी यांच्या सल्ल्यानुसार समरा-अल तरबीया ही संघटना स्थापन केले होती नंतर ते विद्यापीठ स्वतंत्र्य क्रांतीचे एक केंद्र बनले. दारूल लूम देवबंदला जे लोक वर्गनी देत होते त्यांचा समावेश या संघटने मध्ये होता. या संघटनेचा उद्देश फक्त वर्गनीच जमा करणे हा नव्हता तर या संघटनेतील सामील व्यक्तींना देश स्वातंत्र्यासाठी तयार करणे हा देखील होता. या संघटनेचे सदस्य सुरूवातीला १९ होते जे मौलाना मोहम्मद कासीम नानेतवी यांचे शिष्य होते. या संघटनेच्या सदस्यामध्ये श्रेष्ठ आलीम मौलाना मेहमूद हसन यांचाही समावेश होता.१ १८५७ च्या लढ्यात मौलाना मेहमूद हसन यांनी समरा-अल तरबीया या संघटने मार्फत स्वातंत्र्याची भावना लोकांत रूजविण्याचे कार्य केले.

**जमियत-उल-अन्सारची स्थापना :-** १९०९ मध्ये मौलाना मेहमूद हसन यांनी आपल्या चळवळीची सुरूवात जमियत-उल-अन्सार या संघटनेची स्थापना करून केली. या संघटनेचे सचिव मौलाना उबेदुल्लाह सिंधी हे होते. १९११ साली मुरादाबाद येथे मौलाना अहेमद हसन अमरोही यांच्या अध्यक्षतेखाली या संघटनेचे पहिले अधिवेशन भरले होते. या संघटनेची स्थापना म्हणजे नंतर सुरू झालेल्या स्वातंत्र्य चळवळीची सुरूवात होती. या काळात मौलाना अबूल कलाम आझाद आपल्या अलहिलाल या वर्तमान पत्रामार्फत स्वातंत्र्य चळवळीला खतपाणी पुरविण्याचे कार्य अतिशय जोमाने करीत होते. त्यांनी देश भक्ती आणि इंग्रजा विषयी भारतीयांच्या मनात द्वेष निर्माण करणारे लेख लिहून स्वातंत्र्यासाठी देशात जागृती निर्माण केली.

**मौलाना मेहमूद हसन यांची स्वातंत्र्य चळवळ :-** १९१५ मध्ये मौलाना मेहमूद हसन यांनी अनेक वर्षांच्या गुप्त तयारी नंतर भारतातील



Scanned by CamScanner

ब्रिटिश साम्राज्याची मूळे उखडून टाकण्यासाठी एक योजना आखली होती. या योजनेत देशात इंग्रजांच्या विरोधात परराष्ट्राकडून मदत घेवून भारतावर हल्ला करणे या गोष्टीचा समावेश होता. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी १९ फेब्रुवारी १९१७ ही तारीख निश्चित करण्यात आली होती. युद्धाच्या तयारीसाठी मौलाना मेहमूद हसन यांनी मौलाना उबेदूल्लाह सींधी यांना काबूलला पाठविले होते ते १५ ऑक्टोबर १९१५ रोजी काबूलला पोहचले. तेथे त्यांनी १ डिसेंबर १९१५ रोजी भारताच्या निर्वासीत (हंगामी) सरकारची स्थापना केली कारण लोकांचा स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा मिळावा व राष्ट्रासाठी जे नेते कार्यकरीत आहे त्यांचा लोकावर प्रभाव निर्माण व्हावा व ब्रिटीशंच्या मनात या चळवळी विषयी धास्ती निर्माण व्हावी या हेतूसाठी या सरकारची स्थापना करण्यात आली होती. या सरकारच्या अध्यक्षपदी राजा महेंद्र प्रताप यांची निवड झाली होती. मोलाना मेहमूद हसन यांनी सरहद प्रांतातील व इतर भागातील तरूणात जिहादचा उत्साह निर्माण करण्यासाठी आपल्या ज्या समर्थकांना पाठविले होते त्यांची नावे या प्रमाणे :

१) मौलाना सैफूल रहेमान कंधारी, २) मौलाना फजले रब्बी पेशावरी ३) मौलाना अकबर यागिस्तानी, ४) मौलाना फजल मोहम्मद पेशावरी ५) मौलाना मोहम्मद अहमद चकवाली ६) मौलाना फजल वाहेद पेशावरी, ७) मौलाना अझिझ गूल पेशावरी, ८) मौलाना अबूल हसन ताज अमरोटी, ९) मौलाना अबूल सीराज गूलाम मोहम्मद दिनपूरी, १०) शेख अब्दूल रहीम सींधी, ११) मोलाना मोहम्मद मन्सूर अन्सारी, १२) मौलाना उबेदूल्लाह सींधी,२ यांनी आप आपल्या भागात क्रांतीकारी कार्य केले तसेच खॉन अब्दूल गफ्फार खॉन यांनीही शेखूल हिंदच्या या चळवळीला सहकार्य केले होते.[३]

**मौलाना मेहमूद हसन यांची भारताच्या स्वातंत्र्यासाठी योजना**

मौलाना मेहमूद हसन यांच्या भारत स्वातंत्र्य चळवळीच्या योजनेची दोन महत्वाची अंगे होती. सरहद क्षेत्रातील मुस्लिम आदिवासी क्षेत्रात लष्करी तळ उभारून तेथे सैनिकांना संघटीत करून परदेशाकडून सहकार्य मिळवावे व सशस्त्र क्रांतीकारकांच्या माध्यमातुन भारतातील इंग्रजांवर हल्ला करावा व इंग्रजी सत्तेचे उच्चाटन करावे. क्रांतीकारकांचे लष्कर ज्या ज्या मार्गाने जाईल त्या त्या क्षेत्रातील लोकांना इंग्रजांच्या विरोधात भडकावून तेथील व्यवस्था विस्कळीत करावी. हे कार्य मौलाना मेहमूद हसनच्या चळवळीच्या सैनिकांना करावयाचे होते. स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या सैनिकांचे नेतृत्व मौलाना उबेदूल्लाह सिंधी यांनी ही केले.

मौलाना मेहमूद हसनच्या चळवळीचे दुसरे महत्वाचे अंग म्हणजे शस्त्रास्त्र व युद्धासाठी लागणारी रसद प्राप्त करणे किंवा युद्धापूर्वीच त्याची व्यवस्था करणे. या संदर्भात इस्लामी राष्ट्रे, म्हणजे अफगाणिस्तान, तुर्कस्थान आणि ईराण या राष्ट्राकडून सहकार्य मिळविण्याची त्यांची योजना होती. ही जबाबदारी स्वतः मौलाना मेहमूद हसन यांनी आपल्या डोक्यावर घेतली होती.[४] या साठीच त्यांनी मक्केची यात्रा केली वरील योजनेत मौलाना मेहमूद हसन यांना यशाची खात्री होती कारण जगात त्यावेळी पहिले महायुद्ध चालु होते. आंतरराष्ट्रीय युद्ध जन्य परिस्थीतीचा अचूक फायदा घेण्याचा मौलाना मेहमूद हसन यांनी प्रयत्न केला होता कारण तुर्कस्थान हे राष्ट्र ब्रिटनच्या विरोधात होते.

मौलाना मेहमूद हसन मक्केला रवाना: प्रसीद्ध क्रांतीकारी डॉ. मुखतार अहमद अन्सारी यांनी कळविले होते की, मौलाना मेहमूद हसन यांना अटक होण्याची शक्यता आहे त्यासाठी त्यांनी भारताच्या सरहदी बाहेर लवकरात लवकर निघावे. १९१५ साली हज करण्याच्या निश्चयाने तुर्कस्थान, अरब व इतर राष्ट्रांची मदत घेण्यासाठी मौलाना मेहमूद हसन मक्के कडे निघाले. मक्केच्या प्रवासात त्यांच्या बरोबर त्यांचे हितचिंतक मौलाना मोहमद मियाँ, मौलाना मोहम्मद मन्सूर अन्सारी, मौलाना अझिझ गूल पेशावरी, हकीम नुसरत हुसैन, मोहम्मद मुतूर्जा हसन चांदपूरी, मौलाना मोहम्मद सूहेल भागलपूरी, खॉन मोहम्मद मौलवी मतलूब-उल-रहेमान देवबंदी हाजी महेबूब खॉन सहारनपूरी, हाजी अब्दूल हकीम सरोन्जी आणि मौलवी वहिद अहमद मदनी इत्यांदीचा समावेश होता.

**जर्मनीचे शिष्ट मंडळ इंग्रजांच्या विरोधासाठी अफगाणिस्तानात :-** जगात पहिले महायुद्ध चालू असल्यामुळे जर्मनीने भारतातील इंग्रजी सत्तेच्या विरोधी शक्तींना भडकाविण्याचे प्रयत्न चालविले होते. १९१५ मध्ये मौलाना मेहमूद हसन जेंव्हा मक्केला गेले तेंव्हा जर्मनीने आपले एक शिष्ट मंडळ अफगाणिस्तानला पाठविले होते. अफगाणिस्तानने भारतातील इंग्रजांवर हल्ला करावा यासाठी अफगाणिस्तानला प्रेरित करण्यासाठी हे शिष्ट मंडळ अफगाणिस्तानला आले होते. जर्मनीच्या या धोरणा पासून अचूक फायदा घेण्याचा प्रयत्न मौलाना मेहमूद हसनच्या चळवळीने केला. जर्मनीच्या शिष्ट मंडळाने यागीस्तान क्षेत्र, आदिवासी क्षेत्र त्यांचे लष्करी प्रशिक्षण केंद्र याची पाहणी करून काबूल मधील क्रांतीकारकाशी चर्चा केली. आदिवासी क्षेत्रातील लोकांत स्वातंत्र्याची भावना जागृत करण्यासाठी व आधुनिक शस्त्रे चालविण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी मौलाना मेहमूद हसनच्या चळवळीच्या नेत्यांना मार्गदर्शन केले. जर्मनीच्या या शिष्ट मंडळाला मौलाना बरकतउल्लाह भोपाली यांनी सुरक्षित मार्गे अफगाणिस्तानला पोहचविले होते. मौलाना, बरकत उल्लाह हे मौलाना मेहमूद हसनच्या चळवळीचे एक सक्रिय कार्यकर्ते होते. नॉ बन तेग हा जर्मनीच्या शिष्ट मंडळाचा प्रमुख होता. त्याच्या नेतृत्वा खालील शिष्ट मंडळाला जर्मनीच्या



Scanned by CamScanner

कैसर विल्यमने पाठविले होते.[५]

**तुर्की शिष्ट मंडळ अफगाणिस्तानात :-** तुर्की सुलतान खामस गनाई यांने ही काझेम बेगच्या नेतृत्वाखाली एक शिष्ट मंडळ अफगाणिस्तानातील आदिवासी क्षेत्रात पाठविले होते. या शिष्ट मंडळा बरोबर मौलाना बरकत उल्लाह भोपाली आणि राजा महेंद्र प्रताप देखील होते. हे शिष्ट मंडळ पाठविण्याचा उद्देश भारतातील ब्रिटिश सत्तेच्या विरोधात वातावरणाची निर्मिती करणे हा होता कारण पहिल्या महायुद्धात ब्रिटिशांना पराभूत करण्याचा प्रयत्न तुर्कस्थान व जर्मनी करीत होते. त्यांच्या शिष्ट मंडळ पाठविण्यामुळे सरहद क्षेत्रात जागृती झालीच तसेच मौलाना मेहमूद हसनच्या चळवळीला देखील बळ प्राप्त झाले. शिष्ट मंडळ पाठविण्याबाबत जर्मनी आणि तुर्कस्थान यांचा स्वार्थी दृष्टीकोन सुद्धा होता कारण आंतरराष्ट्रीय युद्धात जर्मनी आणि तुर्कस्थान हे दोन्ही राष्ट्रे ब्रिटनच्या विरोधात लढत होती व प्रत्येक प्रकारे ब्रिटनला शह देणे वरील दोन्ही राष्ट्रांचा उद्देश होता. या स्वार्था पोटी दोन्ही राष्ट्रांनी भारतातील क्रांतीकारकांना मदत केली जे अफगाणिस्तानात राहून कार्य करीत होते तसेच मौलाना मेहमूद हसन श्रेष्ठ आलीम असल्यामुळे त्यांच्या व्यक्तीमत्वाचा प्रभाव तुर्कस्थानच्या सुलतानावर पडलेला होता म्हणून त्याने भारतीय क्रांतीकारकांना मदत केली होती. तुर्की शिष्ट मंडळात काही लष्करी अधिकारीही होते. यागीस्तान आणि आदिवासी क्षेत्रातील लोकांना लष्करी प्रशिक्षण देण्यासाठी हे लष्करी अधिकारी सरहद क्षेत्रात आले होते. लष्करी अधिकाऱ्यांत तुर्कांच्या व्यतिरिक्त पठाण देखील होते.

अफगाणिस्तानच्या शहाला खूष करण्यासाठी जर्मनीच्या शिष्टमंडळाने अफगाणिस्तानला शस्त्रास्त्रे, फौज, पैसा, आर्थिक मदत जर्मनी देईल असे आश्वासन दिले होते.

**मक्केचा गव्हर्नर गालीब पाशा व मौलाना मेहमूद हसन यांची भेट :-** १९१५ साली हज केल्यानंतर मौलाना मेहमूदहसन यांनी मक्के चा गव्हर्नर गालीब पाशाची भेट घेतली. भारताच्या स्वातंत्र्यासाठी मौलाना मेहमूद हसन यांनी गव्हर्नरला मदतीची विनंती केली. गव्हर्नर यांने त्यांनामदतीचे आश्वासन दिले होते. त्यांनी भारतीय मुस्लिमात स्वातंत्र्या प्रती उत्साह निर्माण व्हावा यासाठी गालीब पाशाला विनंती केली की, त्यांनी भारतीय मुस्लिमांना एक संदेश द्यावा व त्या संदेशात भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात तुर्कस्थानचे भारतीय क्रांतीकारकांना सहकार्य मिळेल असा उल्लेख असावा. ज्यामुळे भारतीय लोक अधिक तत्परतेने स्वातंत्र्य कार्यामध्ये भाग घेतील. तुर्कस्थानची व मक्केच्या गालीब पाशाची भारताला मदत पहिल्या महायुद्धाच्या परिणामावर अवलंबून होती कारण तुर्कस्थान ब्रिटनच्या विरोधात लढत होते.

तुर्कस्थान युद्धात विजयी झाले तर त्या देशाची मदत भारताला मिळण्याची शक्यता होती परंतु तरीही मौलाना मेहमूद हसन चे सर्व प्रयत्न भारताच्या स्वातंत्र्यासाठीच होते. आंतरराष्ट्रीय परिस्थतीत कसे बदल होतील हे सांगणे कठीन होते म्हणून मौलाना मेहमूद हसन यांनी तुर्कांचे साहय्य मिळवण्याचा जो प्रयत्न केला होता तो योग्यच होता कारण कुठलेही काम करण्यासाठी समर्थन व मदत मिळणं आवश्यक असते व त्यावरच पुढील यश अवलंबून असतात. या प्रकारे मौलाना मेहमुद सहन यांनी प्रारंभीक काळात भारताच्या स्वातंत्र्यासाठी कार्य केले.

**संदर्भ :-**


१) लेखक :- मोलाना असजद मदनी :- जंग-ए-आजादी में जमियत उल्मा -ए-हिंद की ख़िदमाद एक नज़र में पान क्रमांक ९ प्रकाशक, जमियत-उल्मा-ए-हिंद नवी दिल्ली.

२) लेखक : उबेदूल्लाह फहद फलाही :- तारीख दावत व जीहाद पान क्र. १७३. प्रकाशक :- हिंदूस्तान पब्लिकेश दिल्ली.

३) लेखक : उबेदूल्लाह फहद फलाही :- तारीख दावत व जीहाद पान क्र. १७३. प्रकाशक :- हिंदूस्तान पब्लिकेश दिल्ली.

४) लेखक :- मौलाना असजद मदनी :- निशान-ए-राह पान क्र. २१ प्रकाशक :- जमियत उल्मा-ए-हिंद- नवी दिल्ली.

५) लेखक :- असीर अदरवी:- हजरत शेखूल हिंद हयात और कारनामे पान क्र. १९७:- प्रकाशक :- शेखूल हिंद अकॅडमी दारूल उलूम देवबंद ज़िला साहरणपुर (यु.पी).

६) Original Record (मूळ कागदपत्रे सुरक्षीत) जमियत उल्मा-ए-हिंद- कार्यालय, बहादूर शहा झफर मार्ग, नवी दिल्ली.

७) Write :- D.R. Goyal :- Maulana Hussain Ahmad Madni - Publishers MaulanaAbul Kalam Azad Institute of Asian Studies Kolkata. Anamika Publishers & Distributors Pvt. Ltd.

८) Writer:- Prof: Rafat Ali Khan, Prof. Zafar Ahmad Nizami:- The Role of Muslims In the Indian Freedom Struggle. १८५७-१९४७ Valume I,II,III. Publishers:- Genuine Publications and Media Pvt. Ltd. New Delhi - ११००१३. India.


❑❑❑



Scanned by CamScanner

www.vidyawarta.com

https://goo.gl/Zq6V25

प्रिंटींग एरिया शोधपत्रिका को इंडेक्स (iijif) किया गया है, तथा इम्पॅक्ट फॅक्टर (5. 011 ) भी हैं।

https://goo.gl/JRQzLD

प्रकाशन अवधिकता के साथ भाषा और प्रकाशन माह दिये गये है ।

https://goo.gl/cqGSbx

संपादकीय मंडल सदस्यों की पुरी सूची दी गई है, जिसमें पत्ता, ई मेल, अॅड्रेस, संपर्क सूत्र आदी डिटेल्स हैं।

https://goo.gl/cqGSbx

मराठी, हिंदी और इंग्रजी भाषा के अनुसार आर्ट्स , कॉमर्स , सायन्स के सभी विषयोकी एक्स्पर्ट एडिटोरियल टीम बनाई गई हैं । उनके द्वारा रिव्हू करके शोधपत्र

Indexed

IMPACT FACTOR 5.011 iijif

₹ 400/-

ISSN 2394-5303

**Edit By**
Dr. Gholap Bapu Ganpat
Parli Vaijnath, Dist.Beed 431 515
(Maharashtra, India)
Cell : +91 75 88 05 76 95

**Publisher & Owner**
Archana Rajendra Ghodke
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed-431 126
(Maharashtra) Mob.09850203295
E-mail: vidyawarta@gmail.com
www.vidyawarta.com

Scanned by CamScanner